2	Net Profit/ (Loss) from ordinary activities (before Tax, Exceptional and/ or Extra-ordinary Items)	(15.75)	(8.59)	12.26	(16.40)	22.84	37.34
3	Net Profit/ (Loss) from ordinary activities before Tax (after Exceptional and/ or Extra-ordinary Items)	(15.75)	(8.59)	12.26	(16.40)	22.84	37.34
4	Net Profit/ (Loss) for the period after Tax	(15.67)	(8.52)	9.90	(16.24)	18.15	27.61
5	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/ (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income for the period (after tax)]	(15.67)	(8.53)	10.03	(16.24)	17.85	27.95
6	Paid-up Equity Share Capital (Face Value of Rs. 10 each)	660.20	660.20	660.20	660.20	660.20	660.20
7	Reserves (Excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year)	-	-	-	-	-	(550.44)
8	Earnings per Equity Share*						
	Basic (Rs.)	(0.24)	(0.13)	0.15	(0.25)	0.27	0.42
	Diluted (Rs.)	(0.24)	(0.13)	0.15	(0.25)	0.27	0.42
	*Earning per Equity share for the quarter and half year ended are not annualized						
	See accompanying notes to the financial results						

THE KEY INFORMATION OF THE STANDALONE FINANCIAL RESULTS OF THE COMPANY ARE GIVEN BELOW :

(Rs. In lakh, except EPS)

Sr. No.	Particulars	Figures for the Quarter ended on			Figues for the Half Year ended on		Year Ended
		30-Sep-26	30-Jun-26	30-Sep-25	30-Sep-26	30-Sep-25	31-Mar-26
		Unaudited	Unaudited	Unaudited	Unaudited	Unaudited	Audited
1	Total Income from operations	-	-	176.21	-	319.57	572.47
2	Net Profit/ (Loss) from ordinary activities (before Tax)	(9.55)	(13.61)	9.57	(23.16)	18.08	32.85
3	Net Profit/ (Loss) for the period after Tax	(9.48)	(13.53)	7.21	(23.01)	13.39	25.70
4	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/ (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income for the period (after tax)]	(9.48)	(13.55)	7.33	(23.01)	13.09	26.04

Notes:

1 The Unaudited Financial Results have been reviewed by the Audit Committee and approved in the meeting of Board of Directors held on November 02, 2026 and Statutory Auditors of the company have carried out review of the same.

2 The Company operates in Single Business Segment. Therefore, Segment reporting is not applicable to the Company. Business segment has been identified as separable primary segment taking into Account the organizational and internal reporting structure as well as evaluation of risk and return of this segment.

3 The figures for the quarter and half year ended September 30, 2026 are the balancing figures between unaudited figures for the six months ended September 30, 2026 and unaudited figures for the quarter ended June 30, 2026, which were subjected to limited review by the statutory auditor of the Company.

4 Figures of Previous Year have been regrouped/rearranged reclassified wherever necessary.

5 The above is an extract of detailed format of financial results filed with stock exchanges under regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015 The full format for quarterly financial results are available on the website of Stock Exchange https://www.bseindia.com and also on the Company's website https: http://www.rajkamalsynthetics.com/. The same can be accessed by the QR Code provided below.

On behalf of the Board of Directors
FOR RAJKAMAL SYNTHETICS LIMITED

Ankur Ajmera
Managing Director and CEO
DIN:07890715

Place: Mumbai
Date: November 02, 2026

सारांश

'सकाळ लिटफेस्ट'मध्ये १३ नोव्हेंबर रोजी एस. आनंद यांचा 'वेदासि विटाळ' हा कार्यक्रम ऐकण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमाविषयी व सादरीकरणासंबंधी त्यांच्याशी साधलेला संवाद.



चोखोबांचे वेगळे पैलू अनुभवण्याची संधी

प्रश्न : 'वेदासि विटाळ' या कार्यक्रमाची संकल्पना तुम्हाला कशी सुचली? हा कार्यक्रम सादर करण्यामागील तुमची प्रेरणा कोणती?

उत्तर : कर्नाटकी शास्त्रीय संगीत समाजातील उच्चवर्णीयांचेच प्रतिनिधित्व करीत आहे, असे वाटल्याने ऐन विशीतच मी ते शिकणे थांबवले. तेव्हापासून मी समाजातील जातीयतेविरुद्ध काम करण्याचे निश्चित केले. मी गाणे पूर्णपणे थांबविले. असे असले तरी मी विविध प्रकारचे गाणे ऐकत मात्र होतो. त्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताकडे, विशेषतः धृपद गायकीकडे मी आकृष्ट झालो. या गानप्रकारात शब्द नसून ते केवळ आलापांवर आधारित असल्याने ते मला विशेष भावले.

वर्ष २००३मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आदर्श ठेवून मी नवायन ही प्रकाशन संस्था सुरू केली. पुढे २००७मध्ये मी चेन्नईहून दिल्लीला आलो. २०१४मध्ये मी पुन्हा संगीताकडे वळलो आणि कबीरगीते गाऊ लागलो. २०१८मध्ये मी वासिफुद्दीन डागर यांच्याकडे धृपद गायन शिकू लागलो. तब्बल दहा वर्षे कबीरगीते आणि कबीर चरित्राचा अभ्यास केल्यावर २०२४मध्ये 'द नॉटबुक ऑफ कबीर-थिनर दॅन वॉटर, फिअर्सर दॅन फायर' हे पुस्तक प्रकाशित केले. त्याबरोबरीने मी 'बौद्ध सुत्ते' गाऊ लागलो. याच मार्गावर मला संत चोखामेळा भेटले. तोवर विठ्ठलाचे निस्सीम भक्त ही त्यांची जनमानसात प्रचलित असलेली प्रतिमाच मला ठाऊक होती. पण जसजसे मी त्यांना खोलवर जाणत गेलो, तेव्हा प्रस्थापित वर्णव्यवस्था, त्यांची विचारसरणी, वेद आणि शास्त्रांवर सवाल उपस्थित करणारा क्रांतिकारक मला दिसला. त्यांचे सर्व अभंग उपरोधिक आहेत. विठ्ठल हा आधी भगवान बुद्धाचा अवतार आहे, असे बाबासाहेब आंबेडकर मानत असत. २०२३ ते २०२५ या काळात चोखोबांचे, ज्यांना मी चोखा साहेब म्हणत असे, त्यांच्या ३० अभंगांना चाली लावून मी ते सादर करू लागलो. तेव्हापासून संधी मिळेल तेव्हा मी त्यांचे अभंग सार्वजनिक मंचांवर गात आहे. 'सकाळ लिटफेस्ट'मध्ये प्रथमच मी चोखोबाकेंद्रित कार्यक्रम सादर करतोय.

: 'सकाळ लिटफेस्ट'मधील सादरीकरणातून उपस्थितांना नवीन असे काय मिळेल, जे आजवर त्यांनी पाहिले नव्हते?

: चोखोबांचे अभंग गाणारा मी पहिला गायक नाही. या आधी कृष्णराव फुलंब्रीकर, बालगंधर्व, कुमारगंधर्व, पं. भीमसेन जोशी अशा अनेक दिग्गज गायकांनी चोखोबांचे अभंग गायले आहेत आणि आजही अनेक गायक गात आहेत. पण मला चोखोबांची आजवर दुर्लक्षित राहिलेली बाजू समोर आणायची आहे. मला ते फक्त हीन-दीन भक्ताच्या प्रतिमेत दिसत नाहीत. समाजातील प्रतिष्ठित गटाने त्यांचे निवडक अभंग गायले. १९५६मध्ये बाबासाहेब आंबेडकर आणि अनुयायांच्या धर्मांतरानंतर आंबेडकरी विचारांच्या अनेक बांधवांनी चोखोबांकडे पाठ फिरवली. पण बाबासाहेबांनी मात्र त्यांचे एक पुस्तक चोखोबांना अर्पण केले. मी आजवर दुर्लक्षित राहिलेले चोखोबा सादर करतोय. 'वेदासि विटाळ' हा अभंग कोणीच सादर करत नाही. हा अभंग 'हा छंद नकोसा झाला' या अभंगाप्रमाणे दुःखाची परिसीमा व्यक्त करतो. सवर्णांनी मारहाण केल्यानंतर चोखोबा पोलिसात जाऊन तक्रार करू शकले नाहीत. त्यांनी त्यांच्या वेदना, आक्रोश अभंगांतून व्यक्त केला. हे अभंग हेच त्यांच्या वेदनेचे प्रमाण आहेत. चोखोबा ही अशी व्यक्ती आहे ज्यांच्या कुटुंबातील त्यांची पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहीण निर्मळा, आणि तिचा पती बंका हे सगळेच कवी होते. हे कुटुंब महाकवी रवींद्रनाथ टागोरांसारखंच होतं. येत्या १३ नोव्हेंबर रोजी तुम्ही 'विस्फोटक चोखोबा' अनुभवणार आहात, एक परिपूर्ण विद्रोही!

: उपस्थितांना काय अनुभवायला मिळेल?

: चोखोबा तुम्हाला थक्क करून सोडतील....

'सकाळ मनी'च्या दिवाळी अंकाचे पुण्यात प्रकाशन



संवाद सभागृह, सकाळ कार्यालय : 'सकाळ मनी' दिवाळी अंकाचे प्रकाशन करताना प्राची गावस्कर, रवींद्र रायकर, मुकुंद लेले, डॉ. अपूर्वा जोशी आणि प्रसन्न देवी.

पुणे, ता. ३ : '''जेन झी' ही पिढी स्वतःच्या आनंदाला, मानसिक शांततेला आणि कामाच्या समतोलाला महत्त्व देते. त्यांच्याकडे आर्थिक पर्यायांचे विश्लेषण करण्याची क्षमता आणि निर्णय घेण्याचा वेग आहे. मात्र, या वेगाला आधीच्या पिढीचा संयम आणि अनुभवाची जोड मिळाली, तर आर्थिक निर्णय अधिक योग्य होतील. त्यासाठी पालक आणि मुलांमध्ये पैशाच्या विषयावर मोकळा संवाद होणे गरजेचे आहे,'' असे मत सर्टिफाइड फॉरेन्सिक अकाउंटंट डॉ. अपूर्वा जोशी यांनी मंगळवारी व्यक्त केले.

'सकाळ मनी'च्या २०२६ च्या दिवाळी अंकाचे प्रकाशन डॉ. जोशी यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी 'सकाळ मनी'चे संपादक मुकुंद लेले, 'सकाळ'च्या वितरण विभागाचे सरव्यवस्थापक रवींद्र रायकर, जाहिरात विभागाचे मुख्य व्यवस्थापक प्रसन्न देवी आदी उपस्थित होते.

जोशी म्हणाल्या, ''पूर्वीच्या पिढीने भविष्यातील गरजा लक्षात घेऊन काटकसरीने खर्च केला. 'जेन झी' मात्र स्वतःच्या आनंदासाठी, आरोग्यासाठी आणि मानसिक शांततेसाठी खर्च करण्याला प्राधान्य देते. आज मोबाईलवर एका क्लिकमध्ये बँक खाते उघडणे, एसआयपी सुरू करणे किंवा गुंतवणुकीचे पर्याय शोधणे शक्य झाले आहे. मात्र, या वेगवान व्यवहारांमध्ये डिजिटल फसवणूक आणि 'फोमो'मुळे चुकीचे आर्थिक निर्णय घेण्याचा धोकाही आहे.''

जागतिक घडामोडींचा शेअर बाजारापासून पेट्रोल-डिझेलच्या दरांपर्यंत आणि पर्यायाने सामान्यांच्या खिशावर परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत खरी आणि विश्वासार्ह माहिती ओळखणे महत्त्वाचे झाले आहे. त्यासाठी 'सकाळ मनी'सारख्या अंकाचे महत्त्व अनन्यसाधारण असून, हा अंक पालक आणि तरुण पिढी यांच्यात आर्थिक विषयांवरील संवादाचा पूल ठरू शकतो, असेही त्या म्हणाल्या.

लेले यांनी प्रास्ताविकात दिवाळी अंकाविषयी माहिती सांगितली. ''यंदाचा अंक २६० पानांचा असून, त्यातील २० ते २२ पाने 'जेन झी' या मध्यवर्ती संकल्पनेवर आहेत. तज्ज्ञांच्या लेखनातून आर्थिक साक्षरता वाढविण्याचा आणि किचकट आर्थिक विषय सोप्या मराठीत वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे,'' असे ते म्हणाले. नेहा लिमये, डॉ. वीरेंद्र ताटके, विक्रम अवसरीकर या लेखकांनी मनोगत व्यक्त केले. प्राची गावस्कर यांनी सूत्रसंचालन केले.

'सकाळ मनी'मुळे आर्थिक विषयांकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहता आले. कंपनी सेक्रेटरी म्हणून काम करताना लेखनाची कल्पनाही नव्हती; मात्र या व्यासपीठाने लेखनाची संधी दिली. 'जेन झी'वरील लेखाच्या निमित्ताने मुलींशी आर्थिक नियोजन, नाती आणि बदलत्या जगातील त्यांच्या प्रश्नांवर संवाद घडला. आधीच्या आणि नव्या पिढीतील संवाद वाढविणे हे या अंकाचे महत्त्वाचे योगदान आहे.
- **नेहा लिमये,** लेखक

'सकाळ मनी'ने पुण्याबरोबरच सातारा, अमरावती, चंद्रपूर, सोलापूर, नांदेड, मडगाव अशा विविध भागांतील तरुण-तरुणींना लेखनाची संधी दिली. या विद्यार्थ्यांनी स्टार्ट-अप, शेतीचे अर्थकारण आणि नोकरीतील बदल अशा विविध विषयांवर लेख लिहिले. आर्थिक विषय रंजकपणे मांडणारा अंक सातत्याने प्रकाशित करणे सोपे नाही.
- **डॉ. वीरेंद्र ताटके,** लेखक

वैद्यकीय आणि मानसोपचारविषयक लेखनाप्रमाणेच आर्थिक विषयांची परिभाषाही सर्वसामान्यांच्या भाषेत येणे आवश्यक आहे. 'सकाळ मनी'मधील तज्ज्ञ लेखक हे काम सोप्या पद्धतीने करतात. या अंकाची डिजिटल आवृत्ती उपलब्ध झाल्यास जगभरातील मराठी वाचकांपर्यंत आर्थिक ज्ञान पोहोचेल. त्यामुळे या पक्रमाला जागतिक स्तरावर विस्तारण्याची संधी आहे.
- **विक्रम अवसरीकर,** लेखक

दोन मुलांसह आईची खालापुरात आत्महत्या

पान १ वरून

असल्याने पैसे देण्यात विलंब होत होता. देसाई त्यावरून त्रास देत होते. सोमवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास देसाई पती-पत्नी मच्छिंद्र याच्या फ्लॅटवर पैसे मागण्यासाठी गेले होते. मच्छिंद्र घरी नसल्याने त्यांनी त्याची पत्नी मानसी हिला शिवीगाळ करत पैशांची मागणी केली. हा त्रास असह्य झाल्याने मानसी यांनी दोन मुलांसह अकराव्या मजल्यावरून उडी मारली. मच्छिंद्र यांनी रसायनी पोलिस ठाण्यात देसाई पती-पत्नी विरोधात तक्रार दिली असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांनी घटनास्थळी भेट दिली असून, आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना केल्याची माहिती दिली आहे.

गेटवे डिस्ट्रिपार्क्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: सेक्टर ६, द्रोणागिरी, तालुका उरण, नवी मुंबई, रायगड महाराष्ट्र- ४००७०७, सीआयएन: L60231MH2005PLC344764
कॉर्पोरेट ऑफिस: ४था मजला, प्रायस प्लॅटिनम, साकेत डिस्ट्रीट सेंटर, नवी दिल्ली ११००१७, भारत. दूरध्वनी: +९१ २२ २७२४ ६५००, फॅक्स: +९१ २२ २७२४ ६५३८
ईमेल: investors@gatewaydistriparks.com; वेबसाइट: www.gatewaydistriparks.com

भागधारकांसाठी सूचना

कागदोपत्री स्वरूपातील सीयुरिटीजचे हस्तांतरण तथा डीमटेरियलायझेशनकरिता स्पेशल विन्डो

सेबी परिपत्रक क्र. एचओ/३८/१३/११ (२) २०२६-एमआयआरएसडी - पीओडी/आय/३७५०/२०२६, दि. ३० जानेवारी, २०२६ नुसार तसेच वर्तमानपत्रात दि. १२ फेब्रुवारी, २०२६, दि. ०२ जून, २०२६, दि. १६ जुलै,२०२६ व दि. ०९ सप्टेंबर, २०२६ रोजी प्रकाशित आमच्या जाहीर सूचनांच्या अनुषंगाने, कंपनीच्या भागधारकांना सूचित करण्यात येत आहे की, पूर्वी दाखल करण्यात आल्या नव्हत्या किंवा दस्तावेज, प्रक्रियेतील कमतरता वा अन्य कारणास्तव रद्द झालेल्या /परत आलेल्या / दुर्लक्षित राहिलेल्या विनंत्या यांबरोबरच भागधारकांना दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी विक्री/खरेदी करण्यात आलेल्या कागदोपत्री स्वरूपातील सीयुरिटीजचे हस्तांतरण व डीमटेरियलायझेशन विनंत्या दाखल करणे/पुन्हा दाखल करता येण्याकरिता दि. ०५ फेब्रुवारी, २०२६ ते दि. ०४ फेब्रुवारी, २०२७ या एक वर्षाच्या कालावधीकरिता स्पेशल विन्डो खुली करण्यात आली आहे.

कृपया नोंद घ्यावी की,विवादित असलेली प्रकरणे तसेच गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (आयईपीएफ) कडे हस्तांतरित सीयुरिटीज सदर स्पेशल विन्डोअंतर्गत पात्र नसतील.

सदर संधीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र भागधारकांनी संपूर्ण दस्तावेजीकरणासमवेत त्यांच्या विनंत्या कंपनीचे इश्यू आणि शेअर ट्रान्सफर एजंटच्या रजिस्ट्रारकडे (आरटीए) म्हणजेच एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याकडे ईमेल आयडी: investor.helpdesk@in.mpms.mufg.com वर सादर करावी किंवा आरटीए यांना +९१-२२-४९१८६००० या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा कंपनीला investors@gatewaydistriparks.com वर ईमेल पाठवावा.

गेटवे डिस्ट्रिपार्क्स लिमिटेडसाठी
सही/-
दिव्यांग जैन
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०२६
ठिकाण : नवी दिल्ली

क्रॅव्हेटेक्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : १ला मजला, गोदरेज भवन, ४ए होम स्ट्रीट, चरणजित राय मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१.
दुर क्र.: ६६६६७४७४, ईमेल : investors@cravatex.com, वेबसाईट : www.cravatex.com सी आय एन : L93010MH1951PLC008546

३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षासाठी अलेखापरिक्षित प्रमाणित आर्थिक परिणाम (स्टँडअलोन आणि कॉन्सोलिडेटेड) ची सूट

(₹ लाखामध्ये)

अनु. क्र.	तपशिल	स्टँडअलोन			एकत्रीकृत		
		३०.०९.२०२६ रोजी संपलेले ३ महिने	३०.०९.२०२६ रोजी संपलेले ६ महिने	३०.०९.२०२५ रोजी संपलेले ३ महिने	३०.०९.२०२६ रोजी संपलेले ३ महिने	३०.०९.२०२६ रोजी संपलेले ६ महिने	३०.०९.२०२५ रोजी संपलेले ३ महिने
		अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित
१.	प्रवर्तनातुन एकुण उत्पन्न	२८७.८१	५७१.९४	३७८.१४	५,६८३.१५	९,३४५.७८	५,५२४.०३
२.	कालावधीसाठी निव्वळ (कर, अपवादात्मक बाबी पुर्वीचा) नफा / (तोटा)	४४.५९	९१.८६	३३.५९	५९७.१५	६६४.०८	६०७.९२
३.	करपुर्व कालावधीसाठी निव्वळ (अपवादात्मक बाबी नंतरचा) नफा / (तोटा)	४४.५९	९१.८६	३३.५९	५९७.१५	६६४.०८	६०७.९२
४.	कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ (अपवादात्मक बाबी नंतरचा) नफा / (तोटा)	४५.०९	८६.१८	३३.०२	४६२.१६	५०५.९७	५२१.६०
५.	कालावधीसाठी एकुण सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) कालावधीसाठीच्या नफा (तोटा) च्या समावेशासह) आणि (कर पश्चात) इतर सर्व समावेशक उत्पन्न)	४५.०९	८६.१८	३३.०२	४६२.१६	५०५.९७	५२१.६०
६.	समन्याय भाग भांडवल	२५८.४२	२५८.४२	२५८.४२	२५८.४२	२५८.४२	२५८.४२
७.	इतर समन्याय		१,८७२.४८			११,९४३.२२	
८.	प्रती शेअर प्राप्ती (प्रत्येकी रु १०/-) (चालु किंवा बंद कामासाठी)						
	अ) पायाभूत (रु)	१.७५	३.३३	१.२८	१७.८८	१९.५८	२०.१८
	ब) सौमिकृत (रु)	१.७५	३.३३	१.२८	१७.८८	१९.५८	२०.१८

टिप :
१) वरिल वित्तिय निष्कर्षांचे लेखापरिक्षा समितीकडुन पुनर्विलोकन करण्यात आलेले आहे आणि संचालक मंडळाने दिनांक ३ नोव्हेंबर, २०२६ रोजी आयोजित केलेल्या सभेमध्ये ते मंजुर केलेले आहेत.
२) सेबी (सूचीबध्दता बंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमावली, २०१५ चा विनियम ३३ अन्वये मुंबई शेअर बाजारामध्ये दाखल करण्यात आलेल्या अलेखापरिक्षित स्टँडअलोन आणि एकत्रित तिमाही वित्तीय निकालांच्या तपशीलवार स्वरुपाचा एक अर्क आहे. वित्तिय निष्कर्षांच्या तपशिलवार नमुन्याचा वरिल निष्कर्ष हा सारांश आहे. तिमाही वित्तिय निष्कर्षांचा संपुर्ण नमुना शेअर बाजाराच्या (www.bseindia.com) वर आणि कंपनीच्या (www.cravatex.com) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

क्रॅव्हेटेक्स लिमिटेडकरिता
सही/-
राजेश बत्रा
व्यवस्थापकीय संचालक
डीन नं. ०००२०७६४

ठिकाण : मुंबई
दिनांक : नोव्हेंबर ३, २०२६

...शेतकऱ्यांच्या पाठीशी

पान १ वरून

मोदी म्हणाले, ''विकसित भारताच्या वाटचालीत शेतकऱ्यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे सरकार शेतकऱ्यांना सातत्याने सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात जलसंधारणाची अनेक कामे झाली आहेत. मात्र, यंदाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.'' सणासुदीच्या काळात देशातील नागरिकांनी शेतकऱ्यांची आठवण ठेवली पाहिजे. त्यांच्या घरातही दिवाळीचा आनंद कायम राहिला पाहिजे.

पुण्याच्या विकासाला नवी दिशा

''मेट्रोमुळे पुणेकरांचा प्रवास गतिमान होणार असून, शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोमुळे जुन्या आणि नव्या पुण्याला जोडणारा मार्ग तयार झाला आहे. या सेवेमुळे प्रवासाचा वेळ वाचणार आहे. त्यामुळे नागरिकांची कार्यक्षमता वाढून शहराची उत्पादकताही उंचावेल. त्याचा सकारात्मक परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवरही होणार आहे,'' असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

मेट्रो उद्घाटनाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे आदी उपस्थित होते.

भारतीय खलाशाचा हल्ल्यात मृत्यू

नवी दिल्ली, ता. ३ (पीटीआय) : ओमानच्या किनाऱ्याजवळ व्यावसायिक जहाजावर झालेल्या हल्ल्यामध्ये एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला. या जहाजावर १४ भारतीय होते, उर्वरित १३ जणांची सुरक्षित सुटका करण्यात आल्याचे परराष्ट्र मंत्रालयाकडून आज सांगण्यात आले. हे जहाज संयुक्त अरब अमिरातीहून पोरबंदरच्या दिशेने येत होते.

गंधार नहीम अजिज असे मृत खलाशाचे नाव असून, तो मूळचा गुजरातचा आहे. ही घटना ओमानच्या लिमाह गावापासून जवळ सोमवारी सायंकाळी घडली. अल-जुसूफी असे हल्ला झालेल्या जहाजाचे नाव आहे. केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी या घटनेची माहिती दिली. हे जहाज देवभूमी द्वारका जिल्ह्यातील सलाया येथील आहे. सध्याच्या परिस्थितीवर ओमानमधील भारतीय दूतावास लक्ष ठेऊन आहे. तसेच, बचावलेले भारतीय आणि मृत खलाशाचे पार्थिव मायदेशी पाठविण्यासाठी स्थानिक प्रशासनाबरोबर संपर्क साधण्यात आल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, भारताने या हल्ल्याचा निषेध केला असून, या प्रदेशात सातत्याने व्यावसायिक जहाजांवर होत असलेले हल्ले चिंताजनक आहेत. या भागातील तणाव कमी व्हावा आणि या प्रदेशात पुन्हा शांतता व स्थैर्य प्रस्थापित व्हावे, यासाठी सध्याच्या चर्चेतून राजनैतिक तोडगा निघावा, असेही परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे. 'व्यावसायिक जहाजे आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे तातडीने थांबले पाहिजे. आंतरराष्ट्रीय जलमार्गातून मुक्त आणि कोणतीही बाधारहित वाहतूक आणि व्यापार तातडीने पूर्वपदावर आली पाहिजे,' अशी अपेक्षा या निवेदनात नमूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन
(अंगीकृत उपक्रम)

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक- ४२२००२.

*कार्यालय - यशवंतनगर (मोर्चा) पंचायत समितीच्या पाठीमागे, जव्हार, जि. पालघर 401603.
रजि. ऑफीस" आदिवासी विकास भवन ", २ रारामगणेशगडकरी चौक, जुना आग्रा रोड नाशिक 422 002.
दूरध्वनी : 222414, E-Mail- rotdcjawhar@gmail.com

MSC tdc

प्रादेशिक कार्यालय-जव्हार, जि. पालघर

अल्प मुदत जाहीर सूचना

महाराष्ट्र शासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन परिपत्रक क्रमांक :-धानम-1326/प्र.क्र.288/ नापु.29 मंत्रालय विस्तार, मुंबई दिनांक 15 ऑक्टोंबर, 2026 चे निर्देश तथा अटी शर्तीनुसार आधारभूत किंमत खरेदी योजना खरीप व रब्बी पणन हंगाम 2026-2027 मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., प्रादेशिक कार्यालय, जव्हार, जि. पालघर यांचे कार्यक्षेत्रातील पालघर/ठाणे/रायगड जिल्ह्यातील खरेदी केंद्रावर खरेदी झालेल्या भात/धानाची भरडाई करणेसाठी तसेच गोदाम/खरेदी केंद्र ते राईसमिल पर्यंत भात/धानाची वाहतूक करणे व भरडाईपासून तयार तांदूळ (CMR) राईसमिल ते मा. जिल्हाधिकारी यांचे शासकीय गोदामापर्यंत वाहतुक करणे इत्यादी कामासाठी शासनाने निश्चित केलेल्या वाहतुक व भरडाई दराने काम करण्यास इच्छुक असणाऱ्या नोंदणीकृत मिलधारकांकडून बंद लिफाफ्यात जिल्हानिहाय स्वतंत्र संमतीपत्र मागविण्यात येत आहेत. संमतीपत्र व भरडाईसंबधी अटी शर्ती खालील तारखांना कार्यालयीन वेळेत रुपये ३०००/- + १८% GST रक्कम रु. ५४० = एकूण रक्कम रु. ३५४०/- रोख अथवा ऑनलाईनव्दारे रक्कम भरणा केल्यास प्राप्त होईल व खालील नमुद अंतिम दिनांक 25/11/2026 रोजी पर्यत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) प्रादेशिक कार्यालय, जव्हार येथे संमतीपत्र स्वीकृत करण्यात येईल.

अ.क्र.	निविदा प्रक्रिया तपशिल	कालावधी
1	कोरे निविदा फॉर्म प्रादेशिक कार्यालय जव्हार येथे कार्यालयीन वेळेत मिळतील.	दिनांक ०५/११/२०२६ ते दिनांक २५/११/२०२६ कार्यालयीन वेळेत मिळतील.
2	भरलेले निविदा फॉर्म प्रादेशिक कार्यालय जव्हार येथे स्वीकारले जातील.	दिनांक ०५/११/२०२६ ते दिनांक २५/११/२०२६ कार्यालयीन वेळेत स्विकारले जातील.
3	भरलेले प्राप्त निविदा फॉर्म संबंधित मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात	नियोजित दिनांकास
4	कोरे निविदा फॉर्मची किंमत प्रति नग रु. 3540/- GST सह ठेवण्यात आलेली आहे.	

टीप :- धान भरडाई प्रक्रीया शासन निर्णयातील नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीच्या अधीन राहून राबविण्यात येईल. शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती संबंधित गिरणीधारकांवर बंधनकारक राहतील. **(संपर्कासाठी मोबाईल नंबर-7769 939 388/9049 507 410)**

स्वाक्षरी/-
(योगेश सुदाम पाटील)
प्रादेशिक व्यवस्थापक,
म.रा. सह. आदि. विकास महामंडळ मर्या.,
प्रादेशिक कार्यालय, जव्हार

mahindra LIFESPACES

महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेड
सीआयएन : L45200MH1999PLC118949
नोंदणीकृत कार्यालय : महिंद्रा टॉवर्स, ४ए, डॉ. जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८.
वेबसाइट : www.mahindralifespaces.com
दूरध्वनी : ०२२ ६७४७ ८६००, ई-मेल आयडी : investor.mldl@mahindra.com

कागदोपत्री स्वरूपातील सीयुरिटीजचे हस्तांतरण व डीमटेरियलायझेशनकरिता स्पेशल विन्डो

भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, सेबीने त्यांचे परिपत्रक दि. ०२ जुलै, २०२५ अन्वये मूलतः दि. ०१ एप्रिल, २०१९ च्या अंतिम तारखेपूर्वी दाखल करण्यात आलेल्या, परंतु दस्तावेज/ प्रक्रियेतील कमतरता वा अन्य कारणास्तव रद्द झाल्या होत्या / परत आल्या होत्या /दुर्लक्षित राहिल्या होत्या अशा हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करता येण्याकरिता दि.०७ जुलै, २०२५ ते दि. ०६ जानेवारी, २०२६ दरम्यान ६ महिने कालावधीकरिता स्पेशल विन्डो खुली केली होती.

यासंदर्भात तुम्हाला आम्ही सूचित करीत आहोत की, सेबीने त्यांचे परिपत्रक क्र. एचओ/३८/१३/११ (२) २०२६ - एमआयआरएसडी - पीओडी/१३७५०/२०२६, दि. ३० जानेवारी, २०२६ (परिपत्रक) अन्वये दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी विक्री/खरेदी करण्यात आलेल्या कागदोपत्री स्वरूपातील सीयुरिटीजचे हस्तांतरण व डीमटेरियलायझेशनकरिता तसेच वर नमूद केल्यानुसार हस्तांतरण विनंती पुन्हा दाखल करता येण्याकरिता दि. ०५ फेब्रुवारी, २०२६ ते दि. ०४ फेब्रुवारी, २०२७ दरम्यान एक वर्ष कालावधीकरिता अन्य स्पेशल विन्डो खुली केली आहे.

सदर विन्डोच्या व्यवहार्यतेसंदर्भात स्पष्टिकरणाकरिता खालील बाबींची नोंद घ्यावी :

दस्तांतरण विनंती दाखल केल्याचा दिनांक	हस्तांतरण विनंती दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी दाखल केली होती का?	मूळ सीयुरिटी प्रमाणपत्र उपलब्ध आहे का?	विद्यमान विन्डोमध्ये दाखल करण्यास पात्र आहात का?
दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी	नाही (नवीन दाखल केली आहे)	होय	✓
	होय (यापूर्वी रद्द झाली होती/ परत आली होती)	होय	✓
	होय	नाही	×
	नाही	नाही	×

पुढे, सदर स्पेशल विन्डोअंतर्गत खालील बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत :
- हस्तांतरक व हस्तांतरिती दरम्यान विवाद असलेली प्रकरणे.
- गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (आयईपीएफ) कडे हस्तांतरित करण्यात आलेल्या सीयुरिटीज

टीप : *सदर कालावधीदरम्यान पुन्हा दाखल करण्यात आलेले शेअर्स हे हस्तांतरण तथा डीमॅट स्वरूपात प्रक्रियान्वित होतील अर्थात सीयुरिटीज या हस्तांतरितीच्या डीमॅट खात्यात वळत्या होतील व त्या एक वर्षाच्या लॉक इन कालावधीच्या अधीन असतील (सदर लॉक इन कालावधीदरम्यान अशा सीयुरिटीज हस्तांतरित/धारणचिन्हांकित/गहाण ठेवता येणार नाहीत).*

यासंदर्भातील पुढील कोणतीही माहिती/स्पष्टिकरणाकरिता संबंधित भागधारकांनी कंपनी/आरटीए यांना खालील निर्देशित पत्यावर संपर्क साधावा :

महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेड	केफिन टेनॉलॉजिस लिमिटेड (आरटीए)
४ था मजला, ए विंग, महिंद्रा टॉवर्स, डॉ. जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८. ई-मेल : investor.mldl@mahindra.com संपर्क क्र. : + ९१ २२ ६७४७ ८६००	युनिट : महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेड सेलेनियम बिल्डिंग, टॉवर - बी, प्लॉट क्र. ३१ व ३२, फायनान्शिअल डिस्ट्रीट, नानक्रमगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, तेलंगणा, भारत - ५०० ०३२. ई-मेल : einward.ris@kfintech.com संपर्क क्र. : १८०० ३०९४ ००१

दिनांक : ०४ नोव्हेंबर, २०२६
ठिकाण : मुंबई

महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेडकरिता
सही/-
बीजल परमार
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

Pfizer

फायझर लिमिटेड

सीआयएन : L24231MH1950PLC008311
१८०२/१९०१, दी कॅपिटल, प्लॉट क्र. सी - ७०, जी - ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई - ४०० ०५१.
दूर. : + ९१ २२ ६६९३ २०००, फॅक्स : + ९१ २२ २६५४ ०२७४.
ई-मेल आयडी : contactus.india@pfizer.com वेबसाइट : www.pfizerltd.co.in

दि. ३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेली तिमाही व सहमाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निकालांच्या अहवालाचा सारांश

(रु. कोटींमध्ये, प्रतिशेअर उत्पन्न वगळता)

	तपशील	३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेली तिमाही	३० सप्टेंबर रोजी संपलेल्या सहामाहीकरिताची वर्ष ते दिनांक आकडेवारी	३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेली अनुषंगिक तिमाही
		अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित
१.	एकूण उत्पन्न	७७४.११	१४७२.२०	६८४.११
२.	तिमाही/ वर्षाकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबींपूर्व)	२१०.७७	५६७.४५	२५५.३७
३.	करपूर्व तिमाही/वर्षाकरिता निव्वळ नफा (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबींपश्चात)	४२२.८३	६११.५१	२५५.३७
४.	करपश्चात तिमाही/वर्षाकरिता निव्वळ नफा (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबींपश्चात)	३१३.२५	५१७.७२	१८९.०२
५.	तिमाही/वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात) नफा व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश)	३१२.७१	५१६.६४	१८८.११
६.	समभाग भांडवल	४५.७५	४५.७५	४५.७५
७.	राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता (गत वर्षांच्या ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार)	-	-	-
८.	प्रतिशेअर उत्पन्न (प्रत्येकी रु.१०/-) (अवार्षिकीकृत)*			
	मूलभूत	*६८.४७	*११३.१७	*४१.३२
	सौम्यीकृत	*६८.४७	*११३.१७	*४१.३२

टीप :
१. वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एसचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या तिमाही वित्तीय निकालांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. तिमाही वित्तीय निकालांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एसचेंज वेबसाइट www.bseindia.com व www.nseindia.com वर उपलब्ध आहे. सदर माहिती कंपनीची वेबसाइट www.pfizerltd.co.in वरही उपलब्ध आहे.

दि. ०३ नोव्हेंबर, २०२६

फायझर लिमिटेडकरिता
मीनाक्षी नेवटिया
व्यवस्थापकीय संचालक